

# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम.ए.

वर्ष २६, अंक १ ला | १५ जुलै १९५२ | किंमत ४ आणे



जुबिली अंक

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संपादकीय ... ... ... ... | १ |
| २. | विवाह आणि प्रजोत्पत्ति–२ ... ... ... | ३ |
| ३. | अेक अश्लील खटला ... ... ... | ८ |
| ४. | डॉ. स्टोन यांची नामांकित पद्धत ... ... | १२ |
| ५. | पॅरिसच्या परी ' पुस्तकावर अभिप्राय ... | १३ |
| ६. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १४ |
| ७. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १९ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. बागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर :** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

अेका सदभिरुचिसंपन्न, कुलीन, निरोगी, अव्यंग, देखण्या, उंच, ब्रह्मचारी, तिशीच्या तरुणाला केवळ अेकाच सम्मीलनार्थ शक्य तर वरील गुणांना जुळणाऱ्या कुमारिका तरुणीशीं पत्रव्यवहार–परिचय हवा. पत्रव्यवहार गुप्त. योग्य मोबदला. स्वतः कुमारिकांनी लिहावें. Q c/o **समाजस्वास्थ्य मासिक**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई–४.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# संपादकीय

आतां या मासिकाला पंचवीस वर्षें पुरीं होऊन या अंकाबरोबर सव्विसावें वर्ष लागत आहे. या पंचवीस वर्षांत आम्हीं काय केलें ? या मासिकाच्या नांवावरूनच हें समजण्यासारखें आहे की लैंगिक विषयांना वाहून घेण्याचा आमचा उद्देशच नव्हता. तरी देखील पुष्कळ लोकांचा तसा गैरसमज आहे आणि आम्ही अितर विषयांवर कां लिहितों अशी पृच्छा आम्हास अनेकांनी केली आहे. आमचा उद्देश प्रथमपासूनच असा होता की आगरकरांनी ज्या बुद्धिवादाचा पुरस्कार केला, त्या बुद्धिवादाचा प्रकाश शक्य तितक्या विषयांवर पाडून त्याचा प्रसार करावा. अर्थात् बुद्धिवाद आगरकरांनी आपल्या डोक्यांतून काढलेला नाही, त्याचा त्यांनी पुरस्कार केला अितकेंच. परंतु कित्येक बुद्धिवादी म्हणवणारे लोक असें समजतात की आगरकर म्हणजे बुद्धिवादाची कमाल मर्यादा झाली, त्यांच्या पुढें जाणें शक्य नाही. आमचें मतें तें शक्य आहे आणि आम्ही तसा प्रयत्न केला आहे, यामुळें ' हीं मतें आगरकरांना देखील पसंत पडलीं नसतीं ! ' या आक्षेपाला आम्ही बिलकुल किंमत देत नाही. या मासिकांत लैंगिक विषयांना प्राधान्य मिळालें आहे, याचें कारण असें की स्वतःला बुद्धिवादी म्हणवणारे लोक देखील या अेका विषयांत मात्र बुद्धिवादाचा उपयोग करण्यास तयार नसतात. या बाबतींत मनुष्याने जुन्या चाकोरींतूनच चाललें पाहिजे अशी त्यांची नीतीची कल्पना असते, कारण अनीतीची व्याख्याच अशी झाली आहे की स्त्रीपुरुषसंबंधातील चालू निर्बंध

न पाळणें म्हणजे अनीति. अर्थात् बुद्धिवादी न म्हणवणारे लोक देखील हे निर्बंध पाळतात असें नाही, पण ते पाळले पाहिजेत असें म्हणतात आणि पाळल्याचें ढोंग करतात

परंतु मनुष्याचें दुःख जरी बऱ्याच अंशीं अशा प्रकारच्या सामाजिक निर्बंधांवर अवलंबून असलें, तरी समाजाच्या स्वास्थ्याचा अितर अनेक गोष्टींशीं संबंध येतो आणि अशा सर्व विषयांवर बुद्धिवादाचा प्रकाश पाडणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजून यथाशक्ति बजावीत आलों आहों. परंतु आमच्या लैंगिक लिखाणाने बऱ्याच सनातन्यांचा संताप झाल्यामुळें त्यांनी सरकारकडे तक्रारी केल्या व सरकारनें त्यांची दखल घेतली. ती दखल घेण्याचा अेकच मार्ग सरकारला खुला होता आणि तो म्हणजे अश्लीलतेच्या कायद्याखालीं आमच्यावर खटला करणें. या कायद्यांत अश्लीलतेची व्याख्याच नसल्यामुळें, नव्हे अशी व्याख्या करणेंच अशक्य असल्यामुळें, मॅजिस्ट्रेटांना आपल्या मर्जीप्रमाणें कोणतेंही लिखाण अश्लील ठरवून शिक्षा करतां येते. पहिल्या खटल्यांत सरकारी वकिलाने 'वेश्या हा शब्द अश्लील आहे, असें कोर्टांत बिनदिक्कत सांगितलें, परंतु कोर्टाने तें मान्य न करतां निराळ्याच मुद्यावर आम्हास दंड केला. तो मुद्दा असा की सदर लेखांत 'श्रीकृष्णाची चेष्टा आहे आणि श्रीकृष्णाची चेष्टा करणें अश्लील आहे.' हा मुद्दा कमी हास्यास्पद नाही, पण मॅजिस्ट्रेटाला हास्यास्पद कोण म्हणणार? दुसरा खटला याच विद्वानांपुढें झाला व त्यांत त्यांनी मागील गुन्हा लक्षांत घेवून दुप्पट म्हणजे दोनशें रुपये दंड केला. या रकमेपर्यंत त्यांना अधिकार असल्यामुळें तो थोडा वाढवावा, म्हणजे आम्हाला हायकोर्टाकडे अपील करतां येअील, अशी विनंति केली असतां त्यांनी तसें करण्याचें उद्दामपणें नाकारलें. तिसऱ्या खटल्याच्या वेळीं मॅजिस्ट्रेट वेगळा असल्यामुळें आम्ही निर्दोष ठरलों. म्हणजे अश्लीलता मॅजिस्ट्रेटाच्या मर्जीवर असते हें सिद्ध झालें.

अर्थात् सनातन्यांचे हे प्रयत्न चालायचेच, त्यांचें अधिक वर्णन करण्यांत अर्थ नाही. तीनदां खटले होऊनही आम्ही गप्प बसत नाही असें

पाहून पुण्यांतील अेका सनातन्याने निनांवी पत्राने आम्हास कळवलें की 'आम्ही आपलें शीर धडापासून वेगळें करण्याचें ठरवलें आहे.' यावर आम्ही मासिकांतच उत्तर दिलें की मनुष्याला केव्हांतरी मरायचेंच असतें, तेव्हां तो अेक मरणाचा प्रकार होओील. त्याला आम्ही कां भ्यावें? सुदैवाने आमच्यावर शारीरिक हल्ला कधी झाला नाही, हें आमचें भाग्यच म्हणायचें.

आम्हास लोक पुष्कळ वेळां विचारतात, 'तुमचें मासिक अजून चाललें आहे काय?' तें चाललें आहे म्हणण्यापेक्षां चालवलें आहे असेंच आम्हास सांगावें लागतें. कारण मासिकाचा खर्च तरी निदान निघत असेल तर तें चाललें आहे असें म्हणतां येओील, पण संपादकापासून शिपायापर्यंत सर्व कामें स्वतःच विनावेतन करून देखील मासिकाला सुमारें आठशें रुपये वार्षिक नुकसान येत असतां तें चाललें आहे असें कसें म्हणतां येओील? याचें मुख्य कारण म्हणजे या मासिकाला जाहिराती मिळत नाहींत हें होय. हल्ली सर्वच नियतकालिकांची गुजराण जाहिरातींवरच होत असते हें सर्वांना माहीत आहे. आम्हांला अनेकांनी थोडेंबहुत आर्थिक साह्य केलें आहे, परंतु बहुतेक नुकसान आम्हासच सोसावें लागतें. तथापि आम्हास अेक थैली देण्याचें घाटत आहे, तेव्हां आणखी कांही दिवस तरी मासिक चालू ठेवण्याचा बेत आम्ही केला आहे. तो किती टिकतो तें पहावें.

---

# विवाह आणि प्रजोत्पत्ति-२

प्राचीन काळीं स्त्रिया ही मालमत्ता असल्यामुळें अितर मालमत्ता जशी कधीं कधीं चोरीस जाते किंवा जबरदस्तीने हिरावून घेतली जाते, तशीच स्त्रियांचीही स्थिति असे. कुटुंबांतील मुख्य पुरुषाचा सर्वांना दरारा असे आणि तो शारीरिक शक्तीवर अवलंबून असल्यामुळें शक्तीबरोबर तोही कमी होत असे. मुख्य पुरुषाचा सर्व कुटुंबावर हक्क चालत असे आणि अेके काळीं कित्येक गटांत

मुलींही बापाचीच मालमत्ता असल्यामुळें तो त्यांच्याशींही संबंध ठेवीत असे आणि त्याला आडकाठी करण्याची कल्पना देखील अशक्य होती, ' कारण बळी तो कान पिळी ' हाच न्याय सर्वत्र लागू होता. युद्धांत शत्रूच्या स्त्रिया पळवून नेण्याची पद्धतच होती, पण केवळ शत्रूच्याच नव्हे तर कुटुंबांतल्या कुटुंबांतही असे प्रकार होत असत आणि मग नवऱ्याला थोडेंबहुत बक्षिस दिलें म्हणजे तोही कबूल करीत असे. अर्थात् ज्याची ताकद कमी झाली असेल त्याच्यावरच असा प्रसंग येअी. जबरदस्तीने बायका पळवण्याची पद्धत सर्व जगभर असे असा पुरावा सांपडतो आणि अजूनही या पद्धतीचे अवशेष पुष्कळ ठिकाणीं विवाहविधींत शिल्लक राहिलेले दिसतात. रजपुतांच्या विवाहाच्या वेळीं दोन कुटुंबांत जवळजवळ युद्ध झाल्याशिवाय विवाह होत नाही, अशी चाल अजूनही आहे.

अत्यंत प्राचीन काळीं कांही देशांत, उदाहरणार्थ चीनमधें, गटांतल्या स्त्रिया सर्वांची सामाजिक मालमत्ता समजण्याची चाल होती, पण ही चाल फार काळ टिकली नसावी. अशा स्त्रियांचा उपभोग सर्वांना मिळण्याऐवजीं गटांतील बलवानांनाच तेवढा मिळत असे, यामुळें नंतर गटांतल्या गटांत स्त्रीपुरुषांत संबंध होऊं नयेत, कोणाचाही विवाह गटाबाहेरच्या व्यक्तीशींच झाला पाहिजे, असा नियम सर्वत्र झालेला आढळतो. कालांतराने हा नियम फक्त नात्यांतील माणसांपुरताच राहिला, म्हणजे वधूवरांचें कोणतेंही नातें असतां कामा नये असा नियम झाला. अर्थात् हा नियम सर्वत्र सारखा नव्हता. त्याचे अनेक प्रकार होते, उदाहरणार्थ आपल्याकडील गोत्रांसंबंधी बंधनें. मिसर देशांत तर भावांबहिणींचीं लग्नें होत असत आणि हिंदुस्थानांतही ही चाल अेके काळीं होती.

यहुदी, क्रिस्ती आणि मुसलमान हे तिन्ही धर्म बायबलाचा पहिला भाग प्रमाण मानतात, परंतु हल्ली जरी या तिन्ही धर्मांत नात्यांतल्या माणसांच्या विवाहांसंबंधी कडक निर्बंध आहेत, तरी बायबलांत मनुष्याची जी उत्पत्ति दिली आहे, की अीश्वराने प्रथम अेक जोडपें उत्पन्न केलें आणि नंतर

त्या जोडप्यापासून सर्व मानवजात उत्पन्न झाली, तीवरून हें उघड होतें की ॲडॅम आणि अीव्ह या पहिल्या जोडप्याच्या मुलांत परस्पर संबंध झाले असले पाहिजेत, म्हणजे बहिणभावांचे परस्पर संबंध झाले असले पाहिजेत, आणि अशा भयंकर अनैतिक संबंधांपासूनच सर्व मनुष्यजात उत्पन्न झाली, असें हे तिन्ही धर्म मानतात हें उघड आहे.

यहुदी लोकांत गटाबाहेरच विवाह झाले पाहिजेत असा नियम नसून उलट विवाह गटांतच झाला पाहिजे असा नियम होता. यामुळें जवळच्या नात्यांतल्या माणसांचा संबंध होऊं नये म्हणून तें भयंकर पाप मानतात. हिंदू धर्मांतही असेच कडक नियम आहेत, परंतु ते सर्व जातींत सारखे नाहीत, अितकेंच नव्हे तर पोटजातींत देखील नियम वेगळे आढळतात. उदाहरणार्थ चितपावनांशिवाय अितर सर्व ब्राह्मण पोटजातींत मामाच्या मुलीशीं लग्न करतां येतें. परंतु चितपावनांत मात्र तें चालत नाही. हे कडक नियम पाळण्याच्या दृष्टीने यहुदी लोकांत धर्माने सांगितलेले नियम बरेच चमत्कारिक आहेत. उदाहरणार्थ त्यांच्या अेका धर्मग्रंथांत पुढील नियम सांपडतात.

१. कोणत्याही जवळच्या नात्याच्या स्त्रीजवळ तिला नग्न पाहण्याच्या अिराद्याने जाऊं नये. २ आअीला किंवा बापाला नग्न पाहूं नये. ३. बापाच्या बायकोला नग्न पाहूं नये, तें बापाला नग्न पाहण्यासारखें आहे. ४. बहिणीला नग्न पाहूं नये. ५. मुलाच्या किंवा मुलीच्या मुलीला नग्न पाहूं नये. ६. बापाच्या बहिणीला नग्न पाहूं नये. ७. आअीच्या बहिणीला नग्न पाहूं नये. ८. बापाच्या भावाला किंवा त्या भावाच्या बायकोला नग्न पाहूं नये. ९ सुनेला नग्न पाहूं नये. १०. भावाला नग्न पाहूं नये. ११. अेखाद्या स्त्रीला व तिच्या मुलीला नग्न पाहूं नये. १२. दोन बहिणींशीं लग्न करूं नये, कारण दोघींना नग्न पाहिल्याने त्यांच्यांत चढाओढ लागते.

अर्थात् जवळच्या नात्यांत केवळ समागमालाच बंदी न करतां अेकमेकांना नग्न पाहण्याची बंदी केली आहे, कारण नग्न पाहिल्याने समागमाचा मोह पडण्याचा संभव असतो. अर्थात् अेकमेकांना नग्न न पाहतांही अंधारांत

समागम शक्य आहे, पण लेखकाला ही कल्पना सुचली नाही असें दिसतें.

विवाहाने उत्पन्न झालेल्या नात्याचाही यांत विचार केला आहे, कारण दोन बहिणींशीं लग्न करण्यास बंदी आहे. याचा अर्थ केवळ अेका बहिणीशीं लग्न करून ती जिवंत असतांना दुसरीशीं करूं नये, किंवा पहिली मेल्यावरही दुसरीशीं करूं नये, याबद्दल वाद आहे, परंतु अिंग्लंडांत अगदीं अलीकडेपर्यंत बायको मेल्यावरही तिच्या बहिणीशीं लग्न करण्यास बंदी होती.

याविरुद्ध यहुदी धर्मांत कामस्वातंत्र्याविरुद्ध कडक नियम होते आणि क्रिस्ती धर्म त्यांतूनच निघाला असल्यामुळें त्याही धर्मांत हे निर्बंध शिरले आहेत. अगदीं अलीकडे जेव्हां बायकोंच्या बहिणीशीं लग्नाची बंदी काढून टाकण्याकरतां इंग्लडांत कायदा बदलला, तेव्हां लॉर्डांच्या सभेंत या बदलाला अतिशय विरोध झाला, कारण तेथें बड्या धर्माधिकाऱ्यांचें प्रस्थ फार असतें. तरी पण हा फरक मंजूर झाला, कारण या बंदीला कोणतेंही सबळ कारण नव्हतें.

महंमदी धर्म हें खिस्ती धर्मांचें सुधारलेलें स्वरूप समजतात आणि अशाच प्रकारचे नियम त्याही धर्मांत सांपडतात. अर्थात् जवळच्या नात्यांतल्या माणसाच्या समागमाला सर्वच धर्मांत बंदी असते, परंतु जवळचें नातें म्हणजे काय, याची कल्पना वेगवेगळी दिसते.

नात्यांतल्या माणसांच्या समागमाला बंदी कां असावी, याचें कारण वेस्टरमार्कसारख्या कांही समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी असें दिलें आहे की जवळच्या नात्यांतल्या माणसांत प्रेम उत्पन्न होत नाही आणि अशा समागमा-बद्दल लोकांना साहजिक घृणा वाटते. पण अलीकडे या मताला कोणी मान्यता देत नाही. खरें पाहिलें तर ही घृणेची कल्पना खोटी दिसते, कारण असे संबंध जर होतच नसते, तर त्यांना अितकी कडक शिक्षा कां ठेवली असती? शिवाय परस्पर नातें माहीत नसतांना जेव्हां असे समागम होतात, तेव्हां अशा माणसांना घृणा मुळीच वाटत नाही. मग नातें माहीत असल्यामुळें जर घृणा वाटत असेल, तर ती नात्यामुळें नसून विशिष्ट समजुतीमुळेंच वाटत

असली पाहिजे. ती घृणा कृत्रिम असते, नैसर्गिक नव्हे. मिसर देशांत भावा-बहिणींचीं लग्नें होत असत, त्यांना घृणा कां वाटत नव्हती ? शिवाय अभ्यासकांना जर स्त्रियांशीं मोकळेपणाने बोलतां आलें तर त्यांना भावाबहिणींचे आणि बापाचे आणि मुलीचे संबंध पुष्कळ वेळां आढळतात. आअीचा मुलाशीं संबंध मात्र फारच क्वचित् होतो हें खरें, पण याचें कारण बहुधा असें असावें की स्त्रिया सामान्यतः लवकर म्हाताऱ्या दिसतात आणि मुलगा वयांत येअीपर्यंत आकर्षक दिसणाऱ्या स्त्रिया फारच थोड्या असणार. बापाची व मुलीची गोष्ट तशी नसते. पुरुष लवकर म्हातारा होत नाही अितकेंच नव्हे तर मुलींना वयातीत पुरुषांबद्दल पुष्कळ वेळां आकर्षण वाटतें असा अनुभव आहे. जवळचें नातें असल्यास संततीवर अनिष्ट परिणाम होईल याचा कल्पनाच प्राचीन लोकांना नव्हती, तेव्हां या कारणानें बंदी घातलेली असणें शक्य नाही.

तेव्हां जवळच्या नात्यांतला समागम प्राचीनांना भयंकर वाटत असे हें अेका अर्थी खरें असलें, तरी त्याचा अर्थ अितकाच की त्यांच्या कांही वेडगळ समजुतीमुळें त्याचे परिणाम समाजाला अनिष्ट होतील असें त्यांना वाटत असे. उदाहरणार्थ अशा समागमामुळें पीक चांगलें येत नाही अशी रोमन लोकांची समजूत होती आणि अर्थातच या समजुतीमुळें अशा कृत्यांना कडक शिक्षा ठेवली होती हें साहजिक आहे, पण नात्यांतल्या माणसांना अेकमेकांबद्दल आकर्षण वाटत नाही, किंवा त्यांना एकमेकांशीं समागम म्हणजे भयंकर अनीति वाटत असे असें मात्र नाही. असे समागम सर्रास चालू होते, म्हणूनच कडक शिक्षा ठेवल्याशिवाय ते बंद होण्याचा संभव नव्हता. समागमाचे वेळीं मनुष्य स्वतःच्या सुखांत गुंग असतो, त्याला समाजाच्या हिताची पर्वा नसते. परंतु या निर्बंधांत नीतिबाजी बिलकुल नव्हती, केवळ वेडगळ समजुतींवर आधारलेली समाजहिताची काळजी होती.

मग अशा प्रकारची बंदी मुळांत कां घालण्यांत आली ? तिचें कारण अितकेंच दिसतें की जेव्हां कोणतीही बंदी नव्हती आणि बापाला सर्व कुटुंबावर पूर्ण सत्ता होती, तेव्हां तो आपल्या मुलींनाही अितर बायकांपेक्षां वेगळ्या

समजत नसे आणि त्यांच्याशींही समागमाचा हक्क त्याला असे. परंतु त्याला असें आढळलें की भावाबहिणींचे समागम साहजिकच निकट सान्निध्यामुळें वारंवार होत असत आणि ते त्याला पाहवत नसत, कारण मुलींवर मालकी-हक्क त्याचा होता आणि या हक्कावर या समागमांमुळें गदा येत असे. तेव्हां बंदी घालण्याचा मूळ उद्देश भावाबहिणींतील समागम बंद करण्याचा होता आणि अेकदां बंदी घालण्याची प्रथा सुरू झाली, म्हणजे तिचा नेहमी विस्तारच होत जातो असा नेहमींचा अनुभव आहे, त्याचाच प्रत्यय याही बाबतींत येतो. केवळ भावाबहिणींच्याच नव्हे तर अितरही अनेक प्रकारच्या नात्यांचा त्यांत समावेश होऊन विवाहांतही तसे निर्बंध आले. या निर्बंधांत नीतीचा बिलकुल संबंध नव्हता, आपल्या मुलांमुलींचे संबंध बापाला पाहवत नसत आणि मुलींना बापापेक्षां तरुण भावाचें आकर्षण वाटणें साहजिक होतें. तेव्हां यावर निर्बंध घातल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पण या निर्बंधांत हळूहळू बापाचाही हक्क नाहीसा झाला, अितकेंच नव्हे तर वधूवरांत कोणतेंही नातें असतां कामा नये, येथपर्यंत कित्येक ठिकाणीं या निर्बंधाची मजल पोंचली आणि आपल्या-कडील गोत्रव्यवस्था अंमलांत आली. पण अेका काळीं आपल्याकडेही बापाला मुलगा नसला तर मुलीकडून संतति उत्पन्न करण्याचा हक्क होता, असें संशोधक सांगतात.

---

# अेक अश्लील खटला

पोलीस कोर्टांत अेका विक्रेत्यावर अश्लील मासिकें व पुस्तकें विकल्या-बद्दल नुकताच खटला झाला. त्यांत आम्हाला आरोपीतर्फे साक्षीदार म्हणून बोलावलें होतें. कांही मासिकें व पुस्तकें सदर विक्रेत्याकडून पोलिसाने जप्त केलीं होतीं. त्यांत आमच्या मासिकाच्याही कांही प्रती होत्या, परंतु त्यांचा समावेश फिर्यादींत केला नव्हता.

फिर्याद दोनच बाबींवर आधारलेली होती. अेका मासिकांतील अेक

गोष्ट आणि ' चौऱ्यायशीं आसनें ' नांवाचें अेक पुस्तक व विशेषतः त्यांतील आसनांचीं चित्रें. मराठी शब्दकोशांत ' चौऱ्यायशीं आसनें ' याचा अर्थ योगासनें असा दिला आहे, परंतु हीं योगासनें नसून कामशास्त्रांतील संभोगासनें होतीं.

सदर गोष्टींत अेका स्त्रीचा नवरा बाहेरगांवीं गेला असतां त्याचा अेक मित्र तिच्याच खोलींत झोपला होता. थंडी बरीच पडल्यामुळें पांघरूण दोघांनाही पुरेना, तेव्हां तिने सुचवलें की दोघांचीं पांघरुणें अेकत्र करून दोघांनी अेकाच संयुक्त पांघरुणांत निजावें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें. यानंतर त्याच्या कांही कामुक चेष्टा झाल्या, परंतु तो जास्त लगट करूं लागला तेव्हां तिने विरोध करून त्याला नकार दिला. यामुळें संभोग झाला नाही, परंतु तीं तशींच झोंपलीं.

या गोष्टीचें सरकारी भाषांतर श्री. आपटे नांवाच्या गृहस्थांनी केलें होतें. त्यांची साक्ष घेतां त्यांनी ही गोष्ट अश्लील म्हणून आपण अधिकाऱ्यांच्या नजरेस आणली होती, कारण तें आपलें काम होतें, असें सांगितलें. या गोष्टीला तुम्ही अश्लील कां म्हणतां, असें विचारतां ते म्हणाले या गोष्टींतील पात्रांची वागणूक अनैतिक आहे, म्हणून ती अश्लील आहे. अश्लील या शब्दाचा अर्थ वाटेल त्याने वाटेल तसा करावा, कारण त्याची व्याख्या नाही, हा कायद्याचा दोष येथें स्पष्ट दिसतो. चोरीचें किंवा खुनाचें तपशीलवार वर्णन पुष्कळ गोष्टींत दिलेलें असतें, किंवा दातमीपत्रांतही आढळतें, पण त्याला सदर भाषांतरकार देखील अश्लील म्हणणार नाहीत. मग चोरी किंवा खून अनैतिक नाहीत काय ? अर्थात् नाहीत, कारण लोकांना अनीति फक्त एकाच गोष्टींत दिसते. ती म्हणजे विवाहबाह्य समागम. या गोष्टींत तर समागम झाला नाही असें स्पष्ट सांगितलें आहे, तरीपण अेका पांघरुणांत निजल्यावर समागम होणें शक्य आहे म्हणून तें अनैतिक. बाकी खून, मारामारी वगैरेला हरकत नाही.

या गृहस्थांनी असेंही सांगितलें की हीच गोष्ट अिंग्रजींत असती तर तिला अश्लील म्हटली नसती, कारण त्यांच्या समाजांत अशा गोष्टी होतात,

पण आमच्या समाजांत होत नाहीत, म्हणून ती मराठींत अश्लीलच म्हटली पाहिजे. हा त्यांचा गैरसमज आहे. या गोष्टी मराठी लोकांत देखील होतात, पण आम्हाला आर्यसंस्कृतीची घमेंड असल्यामुळें आम्ही तें कबूल करीत नाही. पण अहल्येने अिंद्राशीं जाणून बुजून व्यभिचार केला, ही गोष्ट आपल्या संस्कृतींतच आहे आणि तरी देखील ज्यांचें स्मरण केल्याने महापातकांचा नाश होतो, अशा पांच स्त्रियांत तिचें नांव पहिलें आहे. मग ही संस्कृतीची घमेंड कशाला ? शिवाय वरील गोष्टींत तर व्यभिचारही नाही, फक्त एका पांघरुणांत निजल्याचें सांगितलें आहे. अशा तऱ्हेने अश्लीलतेचा अर्थ पाहिजे तसा करण्याची मुभा असल्यावर हा कायदा म्हणजे कायदाच नव्हे, कोणालाही शिक्षा करण्याची अेक युक्ति आहे असें कां म्हणूं नये ?

यांतच अेके दिवशीं आमची साक्ष झाली. कांही प्रश्न वकिलांनीं व कांही कोर्टाने विचारले. त्या प्रश्नोत्तरांचा सारांश पुढीलप्रमाणें:—

प्र०—या गोष्टींत तुम्हाला कांही अश्लील दिसत नाही काय ?

उ०—मला कशांतच कांही अश्लील दिसत नाही.

प्र०—तुम्ही फारच पुढें गेलेले आहांत, पण सामान्य लोकांच्या दृष्टीने ही गोष्ट अश्लील म्हणतां येणार नाही काय ?

उ०—या बाबतींत अेका खटल्यांत मुंबअीच्या उच्च न्यायालयाने असें मत दिलेलें आहे की अश्लीलता हा भाषेचा प्रश्न आहे. अेकच गोष्ट अश्लील भाषेंत सांगतां येअील किंवा सभ्य भाषेंतही सांगतां येअील. या गोष्टींत कोठेही असभ्य भाषा वापरलेली नाही, तेव्हां वरील मताप्रमाणें तिला अश्लील म्हणण्याचें कारण नाही. अनैतिक म्हणजे अश्लील नव्हे.

प्र०—बरें या पुस्तकांत चौऱ्यायशीं आसनांचीं चित्रें आहेत, तीं तर धडधडीत अश्लील आहेत की नाही ? तीं पाहून तरुण मुलांमुलींच्या मनांत भलभलत्या कल्पना येतील की नाही ?

उ०—लोक सामान्यतः शरीराच्या ज्या भागांना अश्लील म्हणतात, ते भाग या चित्रांत झांकलेले आहेत. फक्त निरनिराळया आसनांत दोघांच्या

शरीराचे जे पवित्रे होतात, ते दाखवले आहेत. विवाहितांना संभोगाची माहिती व्हावी या दृष्टीने हीं चित्रें दिलीं आहेत व तीं समजावीं म्हणून वर्णन दिलें आहे. त्यांत कोणतेही असभ्य शब्द वापरलेले नाहीत. या चित्रांनी तरुण माणसें बिघडतील या म्हणण्यांत अर्थ नाही, कारण पुष्कळ जुन्या देवळांच्या भिंतीवर यापेक्षांही स्पष्ट अशीं संभोगाचीं चित्रें आहेत आणि तीं पहायला कोणालाही बंदी नाही. बायका, पुरुष आणि कोणत्याही वयाचीं मुलें तीं उघडपणें पाहूं शकतात. त्यांनी जर कोणी बिघडत नाही, तर या चित्रांनीच कां बिघडतील ? ( येथे अेक गोष्ट सांगायला पाहिजे होती, ती राहिली. खेडेगांवांत आणि कधींकधीं शहरांतही मनुष्येतर प्राण्यांचा संभोग प्रत्यक्ष दृष्टीस पडतो. कुत्र्यांचा संभोग शहरांतल्या रस्त्यांतही दिसतो आणि तेथें पाहिजे त्या वयाचीं माणसें असतात. कबुतरांचा संभोग सर्वांना दिसतो. खेडेगांवांत तर आणखीही कांही प्राण्यांचा दिसतो, आणि कित्येक ठिकाणीं जेव्हां म्हैस आणि रेडा यांचा संभोग घडवून आणायचा असतो, तेथें त्याला माणसांनी मदत करावी लागते आणि तो समारंभ पहायला स्त्रीपुरुषांची गर्दी होते आणि तेथेंही कोणाला मज्जाव नसतो. या प्रकारांनी जर लोक बिघडत नाहीत, तर या चित्रांनी बिघडतील म्हणण्यांत काय अर्थ आहे ?)

प्र०—तुम्हाला कांहीच अश्लील दिसत नाही म्हणतां, मग संभोगाचा फोटो कोणीं कशाही स्थितींत घेतला तरी तो तुम्हाला अश्लील वाटणार नाही ?

उ०—मला नाहीच वाटणार.

प्र०—मग काय तुमच्या म्हणण्याप्रमाणें हा कायदाच रद्द करावा काय ?

उ०—होय, मला असेंच वाटतें. अगोदर ज्यांत गुन्ह्याची व्याख्याच धडशी दिलेली नाही तो कायदा कसला ? तो गुन्हा झाला की नाही हें समजावें कसें ? तें केवळ मॅजिस्ट्रेटच्या मतावर राहणार. गुन्हा केव्हां होतो हें आगाऊ कळायला कांही मार्ग नाही. हा कसला कायदा ?

---

# डॉ. स्टोन यांची नामांकित पद्धत

कामविषयक प्रश्नोत्तरांच्या अेका फ्रेंच पुस्तकांत पुढील मजकूर सांपडला. **प्रश्न**:– ' स्त्री कोणत्या दिवसांत गरोदर राहणें शक्य आहे, हें तापनळीच्या साह्याने ठरवतां येतें हें खरें का ? ' **उत्तर**:–' बेल्जिअममधील ल्व्हॅं येथील रोमन कॅथोलिक विद्यापीठांतील वैद्यकीय शाखेने संशोधन करून पुढील पद्धत पुरस्कारली आहे. कित्येक महिनेपर्यंत दररोज सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं स्त्रीच्या गुदद्वारांत तापनळी घालून उष्णता किती आहे हें पहावें. नंतर अेका पाळीपासून दुसऱ्या पाळीपर्यंत या उष्णतेंत कसकसा फरक पडत जातो, हें दर्शविणारी बिंदुरेषा काढावी. या रेखेवरून असें दिसेल की ती कांही वेळ चढत जाते व नंतर अेकदम खाली येते. ती जेथे खाली येऊं लागते, तो दिवस अंडें पक्व होण्याचा समजावा. अशा अनेक महिन्यांच्या बिंदुरेखा अेकीवर अेक अशा ठेवल्या, म्हणजे त्या स्त्रीचें अंडें कोणत्या दिवसांत पक्व होतें याच्या मर्यादा सांपडतात. या मर्यादांच्या अलीकडे तीन दिवस व पलीकडे तीन दिवस अितका काल समागम वर्ज्य केल्यास खात्रीने संततिनियमन होतें असें या संशोधकांचें म्हणणें आहे.' हें म्हणणें अगदी काटेकोर आहे असें धरून चाललें तरी ही पद्धत हिंदुस्थानांतील आशिक्षित लोकांकरतां रामबाण म्हणून सांगण्याकरतां डॉ. स्टोन यांना अमेरिकेंतून आणण्यांत काय स्वारस्य होतें ? अेकतर सुशिक्षितांना देखील ही पद्धत त्रासाची वाटेल आणि अशिक्षितांना ती अशक्यच आहे. पण डॉ. स्टोन म्हणतात की कोणत्याही स्त्रीच्या बाबतींत हे दिवस ठरवून देण्याचें काम करायला मी तयार आहें. पण ही रीत किती अशिक्षित स्त्रियांना पसंत पडेल ? शिवाय ही पद्धत काटेकोर नाही, कारण स्त्रीची कामवासना उत्तेजित झाल्याचा परिणाम देखील अंडें ताबडतोब पक्व करण्याकडे होतो असें तज्ज्ञांचें मत आहे. यामुळें गर्भधारणेच्या धोक्यापासून अलिप्त असा अेकही दिवस नसतो असेंच म्हणावें लागतें. ज्यांना मुलें होत नसून पाहिजे आहेत त्यांना, किंवा ज्यांना कृत्रिम

रीतीने गर्भाशयांत पिचकारीने रेत घालून गर्भधारणा करायची असेल त्यांना, मात्र या पद्धतीचा उपयोग होण्याचा संभव आहे. ज्यांना मुलें नको आहेत त्यांना ही पद्धत धोक्याची आहे, हें आम्ही अनेक वेळां लिहिलेंच आहे.

---

# 'पॅरिसच्या परी' पुस्तकावर अभिप्राय

पुरुषांच्या बौद्धिक गरजेची अलीकडे अजाण समाजाकडून–आणि कांही विद्वानांकडूनही कुचेष्टा केली जाते. पण तें थोतांड नव्हे हें या पुस्तकांतील **नीनाँ द लांक्लो** हिचें चरित्र वाचतांना वाचकांच्या लक्षांत यायला वेळ लागत नाही. प्रत्येक बुद्धिमान पुरुषाला बुद्धिमती पत्नी मिळणें अशक्य असतें. मध्ययुगीन कालांत आपल्या भारतांत सौंदर्यवती गणिकांचा वर्ग अस्तित्वांत होता. वैशालीसारख्या लोकशासित राज्यविभागांत दरवर्षी सौंदर्यस्पर्धा होऊन ती जिंकणारी सुंदरी गणिकेचा पेशा स्वीकारीत असे. आम्रपालीची कथा तर प्रसिद्धच आहे. त्या काळीं वैवाहिक जीवनांत नृत्यसंगीतादि कलांचा पुरेपुर आस्वाद पुरुषांना घेतां येत नसे, नि तो लाभावा म्हणून गणिकांची संस्था निर्माण झाली होती. फ्रान्समधें त्या विशिष्ट काळीं नीनाँने पण आपल्या असामान्य बुद्धीने आणि सौंदर्याने बुद्धिवान पुरुषवृंदावर वर्चस्व प्रस्थापित केलें होतें, तिच्याकडे बुद्धिजीवी लोक खेंचले जात होते, नि तिला उच्च समाजांत मानाचें स्थान मिळत होतें. तिच्या विलासप्रियतेमधून आजन्म अविवाहित राहण्याची विचारप्रणाली जन्म पावली नव्हती. तिच्या जीवनांत 'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमतां' या वृत्तीला जितकें प्राधान्य होतें, तितकें विकार-विलासपूर्तीला नव्हतें. तिच्यासारखी बुद्धिजीवी महिला कोणा प्रियकराशीं विवाहबद्ध होऊन आपलें जीवन मर्यादित करण्यास राजी होणारी नव्हती. पण तिने अविवाहित राहूनही त्या वेळच्या समाजजीवनांत आपला वैशिष्ट्यपूर्ण असा कायमचा ठसा उमटून ठेवला यांत शंका नाही. तिच्या वृद्धापकाळांतही वृद्धतरुण तिचे पूर्वीपेक्षां

जास्त विभूतिपूजक बनले होते, कांटेकोर नीतिमत्तेच्या पारंपरिक कल्पना खुंटीला लावणाऱ्या तिच्यासारख्या अविवाहित स्त्रीने अितकें प्रभावी जीवन व्यतीत केलेलें क्वचितच दृष्टीस पडेल...सतत वेगाने बदलणाऱ्या समाजपरिस्थितीला गंजलेले आणि मोडलेले नीतिनियम लावीत बसणें म्हणजे आगगाडीच्या अिंजिनाला खटारा चालवण्यास सांगण्यासारखें होय. त्या दृष्टीने प्रो. र. धों. कर्वे आपल्या तार्किक लिखाणानें महाराष्ट्रीय समाजापुढें सतत नवनवे प्रागतिक दृष्टिकोन मांडीत असतात. ...'पॅरिसच्या परी' लिहून त्यांनी आपलें हें कार्य यशस्वी रीतीने चालवलेलें दिसून येतें यांत शंका नाही. (लेखक स० हृदय, महाड. **अंजलि** वासंतिक अंकावरून घेतलेले उतारे.)

---

# पत्रव्यवहार

१

१.—अेंगेल्सचें 'ऑरिजिन ऑफ द फॅमिली' आपण वाचलें आहे काय? आपलें मत काय आहे? २. अलीकडेच मुंबईत कोंकणी परिषद भरली होती आणि गोव्याचे अेक क्रिस्ती गृहस्थ अध्यक्ष होते. कवि बोरकर यांनी जी कोंकणीची कैफियत केली, ती आपण साधनेंत वाचली असेल. कोंकणी-मराठी वादात आपण कुठल्या बाजूचे आहांत? बोरकरांचें म्हणणें आपणास मान्य आहे का? कोंकणीला बोली म्हणणारांचा अेक पक्ष आहे आणि स्वतंत्र भाषा म्हणणारांचा दुसरा आहे. पहिल्या पक्षाचे पुरस्कर्ते द. व्यं. पै, प्रियोळकर, सातोस्कर, वगैरे आहेत व दुसऱ्या पक्षाचे कवि बोरकर व कांहीं गोव्याचे क्रिस्ती आहेत. काका कालेलकरही कोंकणीचा पुरस्कार करतात. त्यांचें मत निस्पृह असेल असें आपणास वाटत नाही का? ती बोली असली तर तिला ग्रांथिक स्वरूप देण्यास आपण हरकत घ्याल का? ती भाषा स्वतंत्र असली आणि उपेक्षित असली, तर तिचा उद्धार करणारांना आपण पाठिंबा द्याल का? गेल्या वर्षी प्रियोळकरांना संमेलनाचें अध्यक्षस्थान मिळालें,

तें त्यांच्या वाङ्मयीन सेवेसाठी की कोंकणी-द्वेषासाठीं ? त्यांनी अध्यक्षपदावरून कालेलकरांना ज्या शिव्या वाहिल्या, त्यांसंबंधी आपलें काय मत आहे ? ३. विनोबा भावे यांच्या भूमिदानयज्ञासंबंधी आपलें काय मत आहे ? जमिनींचा प्रश्न कसा सोडवावा ? कायद्याचा आणि सक्तीचा मार्ग यांशिवाय दुसरा मार्ग असूं शकत नाही का ? ४. बायकांच्या मंदकामतेवर उपाय काय ?
आपला **अेक चाहता.**

**उ.** १. तें पुस्तक आम्ही वाचलेलें नाही. २. कोंकणीसंबंधी आमचें मत प्रियोळकरांसारखेंच आहे. कोंकणी ही बोलीच आहे आणि प्रत्येक बोलीची वेगळी भाषा करूं म्हटलें तर तें अव्यवहार्य आहे. कालेलकरांचें मत निःस्पृह असेल, पण म्हणून तें सर्वांनी मान्य करावें असें नाही. कोंकणीला ग्रांथिक स्वरूप देण्याचा खटाटोप कोणाला करायचाच असेल, तर आम्ही कोण हरकत घेणार ? पाठिंबा मात्र देणार नाही. प्रियोळकरांना अध्यक्षस्थान त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीबद्दलच मिळालें यांत शंका नाही. ते कोंकणीचा द्वेष करतात म्हणजे काय ? अेखाद्या भाषेचा द्वेष करणें याचा अर्थच काय ? मी संमेलनाला गेलों नव्हतों, तेव्हां त्यांनी काय शिव्या दिल्या त्या अैकल्या नाहीत. ३. विनोबा भावे लोकांच्या जमिनी घेऊन काय करतात आणि त्या जमिनींची हल्ली लागवड कोण करतें ? ज्यांनी दिल्या ते अर्थातच करणार नाहीत आणि त्यांची वांटणी झाल्याचें अजून अैकलें नाही. शंकरराव देव म्हणतात, जमीन सर्वांना सारखी वांटायची. सर्वांना म्हणजे कोणाला ? याचा अर्थ ते सांगतील तर बरें होअील. नपेक्षां ती व्यर्थ बडबड आहे. ही व्यवस्था सरकारने आणि कायद्यानेच केली पाहिजे, अेरवीं ती होणार नाही. या बाबतींत आम्ही तज्ज्ञ नाही, तज्ज्ञांच्या सल्ल्याने व्यवस्था झाली पाहिजे. ४. सामान्यतः स्त्रियांना कामपूर्तीला पुरुषांपेक्षां जास्त वेळ लागतो हें खरें, परंतु आमच्या 'आधुनिक कामशास्त्र' मधील 'समागमाची पूर्वतयारी' हें प्रकरण काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणें वागल्यास ही अडचण विशेष भासणार नाही. तथापि कांही स्त्रियांना कामवासनाच फारशी नसते हेंही खरें,

पण त्याला कांही अिलाज नाही. हा प्रकृतीचा दोष आहे आणि स्त्रियांना कामस्वातंत्र्य मिळाल्यास तो कमी होण्याचा संभव आहे, परंतु विवाहसंस्था कायम आहे तोंपर्यंत तें शक्य दिसत नाही. **सं.**

२

मी आपले मासिकांतून अनेक वेळां हस्तमैथुनाने कांहीही दुष्परिणाम होत नाहीत हें मत वाचलें आहे, परंतु माझें बाबतींत कांही दुष्परिणाम घडले आहेत, तरी ते काय कारणामुळें तें सांगा. मला ही संवय वयाचे १५-१६ वे वर्षी लागली, त्या वेळीं प्रकृति सुदृढ असल्यामुळें दिवसांतून २-३ वेळां हा प्रकार केल्याशिवाय चैन पडत नसे. पुढें माझा अेका मुलीशीं संबंध आल्यामुळें कांही काळ हा प्रकार कमी असे, परंतु पुढें २० व्या वर्षी ती मुलगी नवऱ्याकडे गेल्यामुळें तो पुन्हा सुरू झाला. नंतर २३ व्या वर्षी माझें लग्न झालें व नंतर तो कमी झाला. परंतु अिंद्रियांत वक्रता आली व शीघ्रपतन होऊं लागलें. हे दोष हस्तमैथुनामुळें आले आहेत असें मला वाटतें. नसल्यास कारण काय तें सांगा व ते नाहीसे करण्यास औषधी अगर उपचार सांगा. शीघ्रपतनाने स्त्रीला संभोगसुख लाभत नाही असें मी वाचलें आहे, तें खरें का? या कारणाने मी जास्तच अस्वस्थ असतों, तरी उपाय सुचवून उपकृत करा. आपला...

उ. हस्तमैथुनाचे जे परिणाम वाटतात, ते बहुतेक सगळे भीतीचे असतात, असेंही मत आम्ही अनेक वेळां लिहिलें आहे, तें आपल्या लक्षांत नाही असें दिसतें. शीघ्रपतन देखील भीतीनेच होतें. वक्रतेवर कांही उपाय दिसत नाही. शीघ्रपतनाची सविस्तर चर्चा आमच्या 'क्लैब्याची मीमांसा' पुस्तकांत केली आहे व उपायही सांगितले आहेत, परंतु ते स्वतःला करतां येण्यासारखे नाही, डाक्तरांनाच करतां येतील. शीघ्रपतन झाल्यास स्त्रीचें समाधान होत नाही हें खरें आहे. **सं.**

३

वय २८ वर्षें. गेलीं १० वर्षें मीं हस्तमैथुन केलें आहे. पहिलीं

दोनतीन वर्षें आठवड्यांतून दोनतीनदां, नंतर दोनतीन वर्षें आठवड्यांतून दोनदां, व नंतर आठवड्यांतून अेकदां किंवा दहाबारा दिवसांनी अेकदां. या बाबतींत मी मानसिक त्रास मात्र कधी करून घेतलेला नाही. यामुळें म्हणा किंवा माझ्या मूळ प्रकृतीमुळें म्हणा, माझी प्रकृति दिसण्यांत तरी चांगली आहे. साधारणपणें माझे मित्र मला दांडगा समजतात. माझी उंची ५ फूट ५ अिंच असून वजन १४८ पौंड आहे. चेहरा व शरीर तांबूस असून शरीरावर कोठेंही बोटें दाबलीं तर रक्ताचे वळ उठतात. रात्रीं मात्र कधी कधीं थकवा येतो. माझें खाणें बहुधा चांगलें असतें. रोज अंडें, अधूनमधून कोंबडी–बकरा यांचें मटण, दूध, टोमॅटो, वगैरे. वरील संवयी-मुळें अिंद्रियांत वक्रता आली आहे व उत्थापनांतही कमीपणा आहे. लग्न केल्यावर वीर्यस्खलन लवकर होअील की काय, या भीतीने तीनचारदां १५–१५ दिवसांच्या अंतराने वेश्येकडे गेलों, पण तेथील वातावरण व प्रति-ष्ठेची कल्पना, कोण पाहतात की काय या जाणिवेने आधींच हातापायांत पेटके येत व गर्भगळित झाल्यासारखें होअी. यामुळें स्खलन लवकर होअी. आतां खालील प्रश्नांची उत्तरें द्यावीं. १. या परिस्थितींत मी लग्न केलें तर चालेल का ? २. की आतां हस्तमैथुन थांबवून आणखी दोन वर्षांनी लग्न करणें श्रेयस्कर ? ३. अिंद्रियाच्या कमतरतेविषयीं काय करावें ? ४. हस्तमैथुनांत स्खलन लवकर होत नाही, मग तें संभोगाचे वेळींच कां व्हावें. ? ५. मी विवाह केला तर वैवाहिक जीवन या परिस्थितींत सुखी होअील का ? कारण पत्नीला सुख देण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. तिचें नुकसान कां करावें ? ६. मी हस्तमैथुनाचा अतिरेक केला आहे का ? आपला **श्री.**

उ. १. लग्न करण्यास हरकत दिसत नाही. २. दोन वर्षें थांबण्यांत अर्थ नाही. ३. हे उपाय स्वत: करण्यासारखे नाहीत, ते आमच्या 'क्लैब्याची मीमांसा' या पुस्तकांत दिले आहेत, परंतु ते डाक्तरांनींच करावे असे आहेत. ४. संभोगाचे वेळची सर्व परिस्थितिच वेगळी असते व प्रथम पुष्कळांचे मनांत भीति असते. ५. याचें उत्तर खात्रीचें कधींच देतां येत नाही, कारण

तें पत्नीच्या प्रकृतीवर अवलंबून राहील. तो धोका लग्न करणारांना नेहमीच पतकरावा लागतो. ६. अतिरेक केला आहे असें दिसत नाही. सं.

३

(सारांश) ठेंगण्या मुलीशीं उंच तरुणाने विवाह करण्यामधें त्यांच्या शारीरिक सुखांत कितपत सहजता राहील, असा प्रश्न मी आपणास अेकदां विचारला होता. तो मीं निकालांत काढला, तरी त्यामुळें आयुष्यांतला मुख्य प्रश्न सुटला नाहीच, उलट अधिक बिकट झाल्यासारखें वाटतें. कारण कुठ-ल्याही मुलींत अपेक्षेनुसार सारे गुण असतातच असें नाहीं, यामुळें ती मला व मी तिला पूर्ण व खरी सुखी करीन किंवा काय, ही शंका येत जाते व विवाह-बद्ध होऊन सुरळीत मार्गाला लागण्याच्या शक्यतेबद्दल दिवसेंदिवस आशा सोडावीशी वाटूं लागलें आहे व म्हणूनच आपणाला पुढील तसदी देणार आहें. विवाहाचा राजमार्ग नसला तरी शरीरसुखासाठीं अन्य आडमार्ग ( म्हणजे मैत्रिणी, नातेवाअीक, विवाहित वा विधवा स्त्रिया वगैरे ) तरुणांपुढें असतातच. त्यांबद्दलही माझी व त्यांची हरकत असेलसें वाटत नाही, पण आयुष्यातल्या पहिल्याच समागमाबद्दल मात्र माझी अशी ठाम, अचल, तीव्र व सोज्वल अपेक्षा आहे की मी जरी आज ३१ वर्षांचा असलों, तरी वर्तनाने जसा शुद्ध, ब्रह्मचारी तरुण आहें, तशीच शरीराने कुमारिका असलेल्याच तरुणीबरोबर तो घडून यावा. हा माझा कयास मी कधीच सोडणार नाही किंवा मागें घेणार नाहीं, पण अशी कुमारिका तरुणी मात्र माझ्या मैत्रिणींत किंवा नातेवाअिकांत नाही. यासाठीं आपल्या मासिकांत प्रश्नोत्तरांत मला हा सवाल जाहीरपणें करतां येअील का, की अशा प्रकारें केवळ अेकदांच्याच सम्मीलनार्थ कोणी धीट कुमारिका सज्ज असल्यास ती माझ्याशीं पत्रव्यवहार, माहिती, फोटो, वगैरेंची देवघेव करील काय ? योग्य मोबदला मिळूं शकेल. अर्थात् हें आपल्या प्रश्नोत्तरांत जाहीर करणें आपल्याला प्रशस्त वाटत नसल्यास आपण अशा आशयाची छोटी जाहिरात आपल्या मासिकांतून प्रसिद्ध करूं शकाल काय ? अशा जाहिराती मधूनमधून आपल्या मासिकांत आढळतात, म्हणून ही माझी

सूचना आपणांस विशेष आक्षेपार्ह वाटणार नाही असें वाटतें. आपला नम्र **'अनभिज्ञ'**.

उ. आपल्या ब्रह्मचर्याची आपणांस बरीच घमेंड आहे असें दिसतें. आमचें मतें त्यांत घमेंड वाटण्यासारखें कांहीच नाही. पण आपणांस जशी घमेंड वाटते, तशी कुमारिकांनाही आपल्या कौमार्याची घमेंड का वाटूं नये? अितकेंच नव्हे तर आपलें ब्रह्मचर्य आपल्या म्हणण्यावरूनच खरें मानायचें, त्याला कोणताही पुरावा असणें शक्यच नाही, कारण डाक्तरालाही अमुक पुरुष ब्रह्मचारी आहे असें त्याला तपासूनही सांगतां येणार नाही. परंतु याउलट कुमारिकांच्या कौमार्याला बहुधा पुरावा असतो. अशा स्थितींत आणि अेकंदर समाजाच्या चालू समजुतींच्या दृष्टीने स्त्रियांच्या कौमार्याला पुष्कळच जास्त महत्व असतें. आणि आपणासही त्याचें महत्व वाटतें हें आपल्याच म्हणण्यावरून स्पष्ट दिसतें. कुलीन कुमारिकेचा कौमार्यभंग झाला तर तिला लग्नाच्या बाजारांत किंमत शून्य येते, म्हणजे तिला विवाहाची अपेक्षा करतांच येत नाही. वेश्या देखील प्रथमसमागमाबद्दल भरमसाट मोबदला मागतात, तेव्हां कुलीन कुमारिका कोणताही मोबदला घेऊन अशा समागमास तयार झाली, तर तिची रखेली होण्याची तयारी आहे असाच त्याचा अर्थ होअील. अेरवीं ती तयार होणार नाही. शिवाय ती तयार झाली तरी ती कुमारिका आहे हें डाक्तरी तपासणीशिवाय समजणार नाही, म्हणजे आपलें ब्रह्मचर्य जसें आपल्या शब्दावरच खरें मानायचें, तसेंच तिचें कौमार्यही मानावें लागेल, कारण ती डाक्तरी तपासणीला तयार होणार नाही. अर्थात् जाहिरात देणें असल्यास आमची हरकत नाही, परंतु तिचा उपयोग होणार नाही असें वाटतें. **सं.**

---

# शारदेचें पत्र

शालांत परीक्षेच्या निकालाबद्दल नेहमीप्रमाणें ओरड सुरू झाली आहे, पण ज्या निकालांत पहिल्या पंधरा मुलांना ८० ते ८५ टक्के मार्क मिळतात,

त्याबद्दल निदान प्रश्नपत्रिका कठिण होत्या असें म्हणतां येणार नाही आणि परीक्षकांनी फार कडकपणा दाखवला असेंही म्हणतां येत नाही. मग अितकीं मुलें नापास कां झालीं. याचें कारण कांहीतरी वेगळें असलें पाहिजे आणि तें कारण मला हेंच दिसतें की ज्यांची पुरी तयारीच नाही अशा मुलांना परीक्षेला बसूं देतात. याचा अर्थ कांही शाळांतलें शिक्षण गचाळ असतें, किंवा परीक्षेला बसूं देतांना मुलांवर फाजील दया केली जाते. उगाच परीक्षेच्या नांवाने ओरडण्यांत काय अर्थ आहे ?

पनवेलला झालेल्या अेका व्याख्यानांत श्री. सरलाबाअी पाटणकर यांनी वेश्याव्यवसायावर हल्ला केला आणि कांही लोक त्याचा पुरस्कार करतात याबद्दल खेद प्रदर्शित केला. या नीतिबाजीबद्दल त्यांनी त्वतःची पाठ थोपटून घेतली असेल आणि अितरांनीही त्यांचीं पाठ थोपटली असेल, पण विचार न करतां दिलेल्या व्याख्यानाचा हा अेक नमुना आहे. खरें पाहिलें तर वेश्याव्यवसायाचा पुरस्कार कोणीच करीत नाही, म्हणजे वेश्याव्यवसाय ही अेक आदर्श संस्था आहे, किंवा आदर्श समाजाला ती भूषणावह आहे, असें कोणी म्हणत नाही. पण ज्यांना विवाहसंस्था पाहिजे असेल, आणि त्या संस्थेचें ' पावित्र्य ' टिकवायचें असेल आणि तरीही ज्यांना वेश्यावृत्ति म्हणजे भयंकर पाप वाटतें, त्यांना विचार करतां येत नाही असेंच म्हणावें लागतें. सर्वांनी विवाह करावा आणि अेकनिष्ठ रहावें, हें म्हणणें सोपें आहे, पण तें अशक्य आहे. हें म्हणणें गांधींसारख्यांना शोभेल, पण विचार करणारांना शोभत नाही. अेकतर सर्वांना अिच्छा असली तरी विवाह करणें अशक्य असतें हें कोणालाही समजण्यासारखें आहे. तरमग ज्यांना विवाह करतां येत नसेल त्यांनी ब्रह्मचर्याने रहावें, हें म्हणणेंही गांधीछापच आहे, म्हणजे अशक्य आहे. ब्रह्मचर्याचा उपदेश लोकांना करणें फार सोपें असतें, पण गांधींना देखील २४ वर्षें वैवाहिक जीवनाचा अनुभव घेतल्यानंतरच हा उपदेश करण्याची स्फूर्ति झाली. साहाजिकच आहे, ते आपल्याला टॉलस्टॉयचे शिष्य म्हणवीत असत, तेव्हां गुरूप्रमाणेंच त्यांनीही म्हातारपणीं ब्रह्मचर्याचा उपदेश करायला सुरवात केली यांत नवल नाही.

पण हा उपदेश लोकांना कसा पटावा ? वेश्याव्यवसायावर हल्ला केल्याने व्याख्यानांत टाळ्या मिळतील, पण व्यवहारांत त्याला आचरटपणाच म्हणणें भाग आहे. नीतीची अेक ठराविक कल्पना घेऊन, विवाहबाह्य समागम म्हणजे पाप ठरवून, त्यावरून वेश्यावृत्तीला शिव्या देणें हें विचारवंतांचें लक्षण नव्हे, हा पोरकटपणा आहे

आपल्यांत मोठे समजलेले लोक देखील किती बावळट असतात, याचें अेक उदाहरण म्हणजे आमच्या मेयरसाहेबांनी नुकतेंच फलज्योतिषावर केलेलें प्रवचन. माझा ज्योतिषावर विश्वास आहे, असें त्यांनी मोठ्या आव्यतेने सांगितलें आणि सरदार पटेल की दुसऱ्या कोणाचा तरी उल्लेख करून त्यांचाही विश्वास होता असेंही सांगितलें. जेथें विश्वासाचा किंवा श्रद्धेचा प्रश्न उपस्थित होतो, तेथें कितीही मोठ्या लोकांचीं नांवें सांगितलीं तरी त्यांचा उपयोग काय ! त्यावरून अितकेंच दिसतें की फलज्योतिष हें शास्त्र नाही, थोतांड आहे, थापा आहेत, जनतेला फसवण्याचा एक मार्ग आहे. ब्राह्मणांच्या उपजीविकेचा हा अेक धंदा आहे आणि तो जितक्या लवकर नाहीसा होअील तितकें बरें. फसवणुकीवर उपजीविका करण्यांत मोठेसें भूषण नाही. पण सुदैवाने धंदेवाअीक भिक्षुकांचे मुलगे अलीकडे बापाचा धंदा चालवण्यास तयार नसतात हें अेक सुचिन्ह आहे. तरी पण समाजांतल्या वेडगळ समजुती लवकर नाहीशा होणार नाहीत. पुष्कळ लोक अजून देखील विजेचा दिवा लावल्याबरोबर त्याला पटकन नमस्कार करतात हें मी पाहिलें आहे आणि हे आपोआप संवयीनेच होतें, मुद्दाम करावें लागत नाही. हा बावळटपणा जाणार कधीं ?

मद्रासला नुकतीच जी ‘ अिंडिअन रॅशनॅलिस्ट असोसिअेशन ’ नांवाची बुद्धिवादी संस्था निघाली आहे, तिच्या मुखपत्राच्या पहिल्याच अंकांत पुराणप्रसिद्ध बृहस्पतीचे म्हणून पुढील विचार दिले आहेत. ‘ या जगापेक्षां उच्च असें कांहीही नाही. स्वर्ग नाही आणि नरकही नाही. देवांचें जग हें धूर्तांनी आपल्या डोक्यांतून काढलेलें आहे. मनुष्य मरून त्याच्या शरीराची राख

झाल्यावर तो परत कसा येअील? यज्ञ आणि अितर धार्मिक विधि म्हणजे कर्तृत्वहीन भटांच्या उपजीविकेचीं साधनें आहेत. यज्ञांत मारलेला पशु जर स्वर्गाला जात असेल, तर यजमान आपल्या बापालाच कां यज्ञाकरतां मारीत नाही? ब्राह्मणांना जेवायला घातल्याने जर आकाशांतल्या पितरांचें समाधान होत असेल, तर पांथस्थांना बरोबर शिधा द्यायचें कांहीच कारण नाही.' हें कोठून घेतलें आहे मला माहीत नाही, पण प्राचीन काळींही आपल्याकडे आजच्यासारखेच प्रखर बुद्धिवादी होते असें दिसतें, आणि हा प्रकार पाश्चात्यांकडून आपल्याकडे आलेला नाही, हें अिकडचेंच मूळचें पीक आहे असें सिद्ध होतें. चांगले विचार पाश्चात्यांकडून आले तरीदेखील मी त्यांना वाअीट म्हणणार नाही, पण हे तसे नाहीत अितकेंच.

पुणें आणि मुंबई या दोन्ही विद्यापीठांत यंदा बी. अे. च्या परीक्षेंत मुली पहिल्या आल्या ही आनंदाची गोष्ट आहे, मग मुलांना त्याबद्दल कांहीही वाटो. मला आश्चर्य वाटतें तें हें की येथें जी मुलगी पहिली आली, तिने घेतलेल्या विषयांत अध्यात्मविद्या हा अेक विषय होता म्हणे. आधुनिक विद्यापीठांत असा एखादा विषय असतो, हेंच मुळीं मला माहीत नव्हतें. अध्यात्म म्हणजे आत्म्यासंबंधी असा अर्थ होतो, पण जो आत्मा बुद्धिवादी मानीतच नाहीत, त्यासंबंधी ज्ञान काय असायचें? आत्मा हा अेक गैरसमज आहे. अध्यात्मविद्या म्हणजे परलोकविद्या, असाही अेक अर्थ मीं पाहिला. म्हणजे गिरगांवांत जे भुताटकीचा धंदा करणारे ऋषि नांवाचे गृहस्थ आहेत, त्यांना या विषयाचे प्राध्यापक नेमायला हवेत! म्हणजे ज्ञानाचा चांगलाच प्रसार होअील! हें काय गौडबंगाल आहे कांही कळत नाही. अशाच प्रकारच्या ज्ञानांत म्हणजे अज्ञानांत हिंदुस्थानचा नंबर पहिला लागतो, अशी पुष्कळ लोक घमेंड मारीत असतात आणि त्याच्याच जोरावर हिंदुस्थानला जगद्गुरु बनवायला पाहतात. नशीब हिंदुस्थानचें!

आगरकरांनी खरोखर काय केलें याची फार थोड्या लोकांना कल्पना

असते. जे लोक अधिकारी वाणीने बोलायला जातात, त्यांना पुष्कळ वेळां आगरकरांचीं मतें कळलेलींच नसतात. त्यांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीला येथल्या साहित्यसंघाने आचार्य भागवतांना मुद्दाम आगरकरांवर प्रवचन द्यायला बोलावलें होतें. आगरकरांसंबंधी बोलायला त्यांच्या अितका नालायक दुसरा मनुष्य सांपडणें कठीण, कारण आगरकर नास्तिक आणि हे गृहस्थ अध्यात्मवादी ! त्यांनी आगरकरांना अध्यात्मवादाच्या चौकटींत नेऊन बसवलें. यंदाच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने **लोकसत्तेंत** श्री. मनोहर देवधर यांनी अेक लेख लिहिला आहे. त्यांनाही कांही कळलें आहे असें वाटत नाही. ते म्हणतात, ' त्यांचे निबंध कदाचित् टिळक, केळकर, परांजपे यांच्या मोलाचे ठरणार नाहीत. ' कां ठरणार नाहीत ? आगरकरांचें मराठी टिळकांच्या पेक्षांही सरस होतें. केळकर तर त्यांच्या पासंगालाही पुरणार नाहीत आणि परांजप्यांची जरी विशिष्ट पद्धत लोकप्रिय झाली, तरी ती आगरकरांपेक्षां वरचढ मानण्याचें कांहीच कारण नाही. नंतर ते म्हणतात की आगरकरांनी ज्या सुधारणांचा पुरस्कार केला, त्या लोकांना आज सुधारणा वाटत नाहीत. उदाहरणार्थ आज बालविवाह नाहीसा होऊन विभावरी शिरूरकरांसारख्यांची प्रौढविवाह-समस्या उपस्थित होऊन लोक पुन्हा मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष न देतां लग्न उरकून घेण्याकडे लक्ष देऊं लागले आहेत. स्त्रियांना जाकिटें घालण्यास परवानगी मिळावी म्हणून ते जन्मभर झगडले, पण आज स्त्रिया आपलें पोट उघडें टाकतांना दिसतात. आगरकरांनी केशवपनाचा निषेध केला, पण आज स्त्रिया बॉबकट करून घेत आहेत. तेव्हां आगरकरांनी ज्या गोष्टींचा पुरस्कार केला, त्यांच्या उलट लोक दुसऱ्या टोंकाला जाऊं लागले आहेत. पण हा आगरकरांच्या म्हणण्याचा विपर्यास आहे. आज देखील कोणी बालविवाहाला पाठिंबा देत नाही, मग प्रौढांची कांहीही स्थिति होवो. स्त्रियांवर जाकिटें घालण्याची सक्ती असावी असें जर आगरकर कधीं म्हणाले असतील, तर ती आगरकरांची चूक होती असेंच मी म्हणेन. ज्यांना पोट उघडें टाकावें असें वाटत असेल त्यांनी, म्हणजे स्त्रियांनी किंवा पुरुषांनीही, खुशाल

उघडें टाकावें असेंच मी म्हणतें. सक्ती करणें ही सुधारणा नव्हे, केंस माने-पर्यंत आंखूड करणें, म्हणजे केशवपनाच्या दिशेनें जाणें नव्हे, हें देखील या लेखकाला कळूं नये ? आंखूड केंस चांगले दिसतात की नाही याबद्दल मतभेद होईल, पण म्हणून ते लांब ठेवण्याची सक्ती असावी असें मी तरी म्हणणार नाही. हा शुद्ध आचरटपणा आहे. या लेखकाने शेवटी जें म्हटलें आहे की ' आगरकरांच्या सुधारणावादाला नवी दृष्टि देऊन समाजाच्या प्रगतीला हातभार लावण्याचें श्रेय पटकावण्यासाठी दुसरा अेखादा सुधारक तयार होईल काय ?' तें बरोबर आहे, परंतु तें हल्ली होत आहे हें डोळे उघडे ठेवणाराला सहज दिसण्यासारखें आहे. पण बॉबकट म्हणजे केशवपनाच्या दिशेने जाणें आहे असें म्हणणाराला तें दिसावें कसें ?

तुझी **शारदा**

---

**अंजलि वासंतिक अंक.** नियतकालिकांवर आम्ही सहसा अभि-प्राय देत नाही, परंतु या अंकांत प्रो. फडक्यांची अेक सबंध कादंबरी असल्यामुळें तो पुस्तकांच्याच सदरांत येतो. सरिता–सागर ही कादंबरी शेवटपर्यंत वाचावीशी वाटते, परंतु तींत अेक प्रमुख पात्र कृष्णा नांवाची विधवा आहे आणि ती आरंभीं अतिशय समंजस आहे असा भास होतो, परंतु तिचा पूर्वेतिहास आणि पुनर्विवाह केल्यानंतरची देखील वागणूक अेखाद्या सनातनी अबलेला शोभेल अितकी मूर्खपणाची आहे. ही मोठीच विसंगति वाटते आणि या मूर्खपणाचा परिणाम तिलाच नव्हे तर तिच्या दुसऱ्या नवऱ्याला व मुला-लाही भोगावा लागतो. तथापि कादंबरी वाचनीय आहे आणि अितर गोष्टी आणि अितर लेखही वाचनीय आहेत. किं. तीन रु. प्रकाशक, अंजलि प्रकाशन लिमिटेड, वेस्टर्न अिंडिआ हाऊस, फेरोजशहा मेहता रोड, मुंबई–१.

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३–६–०

# आमचेकडे मिळणारा माल

## किंमती कमी केल्या !

**लॅंबट डच कॅप,** रु. ६. **अमेरिकन,** रु. ८. **उभट टोपी,** रु. १॥. **कॉट्रॅसेप्टॅलीन** ( देशी जेली, मोठी नळी ) रु. ३. **कोरोमेक्स जेली** ( अमेरिकन, मोठी नळी) रु. ५. **पिशव्या,** ४ आणे, ८ आणे, १० आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७. **राअिटथ्रूब** ( रोगप्रतिबंधक ), रु. १–२–०, डझनास रु. १३.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**पॅरिसच्या परी,** दुसरी आवृत्ति विक्रीस तयार, रु. ३. **या पुस्तकाची जाहिरात केसरीने नाकारली आहे.**

**प्रो. ना. सी. फडके** यांचीं पुस्तकें :—

**प्रतिभासाधन,** रु. ५. **महात्मा गांधी,** रु. १॥. **किशोर-कथा,** रु. १॥. **भरतीची लाट** ( कादंबरी ), रु. ४. **माझ्या साहित्यसेवेंतील स्मृति** भाग २ रा, रु. ३. **शाकुंतल** ( जप्त झालेली कादंबरी ) रु. ४.

**राअिट अेजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. **क्लैब्याची मीमांसा,** किंमत रु. ६, ट. ख. ८ आणे
२. **आधुनिक आहारशास्त्र,** किं. १॥ रु., ट. ख ८ आणे
३. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], ९ वी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. **संततिनियमन** [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख.७ आ.
५. **गुप्त रोगांपासून बचाव,** ४ थी आ.रु.१, ट.ख.७आणे.
६. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग २ रा [ वर्षे ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख.८ आ.
७. **त्वचेची निगा,** किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. **गुरुबाजी** ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. **वेश्याव्यवसाय,** किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. **तेरा गोष्टी,** किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. **न्यायाचा शोध** (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ
१२. **पॅरिसच्या परी** ( दुसरी आवृत्ति ) रु. ३

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम,** २ री आ., किं. ५ आ.
२. **मूळव्याध,** किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8

**राइट एजन्सी,** नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७
मुद्रक व प्रकाशक—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,**
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४